रजि. नं. – ई -६९

# श्री साईबाबा संस्थान, विश्वस्तव्यवस्था, शिर्डी .

पोस्ट – शिर्डी -४२३१०९, ता .राहाता, जि .अहिल्यानगर, (महाराष्ट्र )भारत दुरध्वनी + -९१-२४२३-२५८५०० फॅक्स + - ९१-२४२३- २५८७७०, टेलिग्राम – साईनाथ, शिर्डी .

जा.नं.एसएसएस/ पाणी पुरवठा /१९५४/२०२६

दिनांक:- 21 AUG 2026

प्रति,

---------------------------------------------

---------------------------------------------

---------------------------------------------

**विषय:- संस्थान कणकुरी साठवण तलावातील मासे विक्री करणेबाबतचे दरपत्रक....**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे पुरवठा विभागामार्फत संस्थानचे कणकुरी येथील साठवण तलावातील मासे विक्री करणेकामी दरपत्रके / कोटेशन मागणी करण्यात येत आहे.

| अ.नं. | तपशिल | प्रति किलो दर | मासे पकडण्याचा कालावधी |
|---|---|---|---|
| ०१ | संस्थानचे कणकुरी साठवण तलावातील मासे पकडणे. | | कालावधी ४५ दिवस |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी ही धर्मदाय संस्था असल्याने खालील अटी व शर्तीनुसार जास्तीत-जास्त दर सिलबंद पाकीटात **" मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,** श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी ता.राहाता, जि.अहिल्यानगर पीन-४२३१०९" या पत्यावर **दि.०३ /०९ /२०२६ अखेर सायं ५.००** वाजेपर्यंत आवक विभागात जमा करावेत. पाकीटावर **"संस्थान कणकुरी साठवण तलावातील मासे विक्री करणेबाबत कोटेशन"** असा वरील बाजूस स्पष्ट उल्लेख असावा.

**अटी व शर्ती:-**

१.संस्थानचे कणकुरी येथील तलावातील मासे पकडणेसाठी नेमून दिलेल्या कालावधीत मासे पकडावयाचे आहेत.

२. ज्या कोटेशनधारकाचे दर सर्वात जास्त असतील त्यास मान्यता देण्यात येईल.

३. मासे पकडण्याचे काम स्वत:चे साहित्यासह स्वत:चे व्यक्तींकडून करावयाचे आहे.

४. मासे पकडतांना कोणताही अपघात झाल्यास त्याची जबाबदारी संस्थानवर राहणार नाही.

५.मासे पकडलेनंतर संस्थानमार्फत लहान-मोठे (सर्व जातीचे मासे) सर्वच मासे यांचे एकत्रित वजन केले जाईल. तसेच वजनात कुठल्याही प्रकारची सुट दिली जाणार नाही. मास्यांची एकत्रित वजनाप्रमाणे होणारी मंजूर दराने रक्कम त्वरीत रोखीने द्यावी लागेल. त्याशिवाय आपणास मालाचा ताबा दिला जाणार नाही.

६.ज्या व्यक्तींचा टेंडरशी संबंध नाही अशा व्यक्तींना साठवण तलावावर येता येणार नाही.

७.संस्थानचे साठवण तलावावर किंवा संस्थान परिसरात मासे विक्री करता येणार नाही.

८.साठवण तलावावर मासे पकडतांना काही वाद झाल्यास किंवा काही गैरप्रकार आढळुन आल्यास आपले टेंडर रद्द करण्याचे अधिकार संस्थानकडे राहतील.

९.मासे पकडतांना मासे मारण्यासाठी कुठल्याही प्रकाचे केमिकल्सचा वापर करता येणार नाही/ अथवा पाण्यात कोणतेही केमिकल टाकता येणार नाही.

१०.सदरची टेंडरसंबंधी काही वाद निर्माण झाल्यास तो राहाता न्यायकक्षेत राहील.

कळावे,

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने.....**

(भिकन दाभाडे)

**कार्यकारी अभियंता**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.